# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १८/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** आपत्ती प्राधान्य

**प्रति,**

१) व्यवस्थापक,
जिल्हा अग्रणी बँक, जालना

२) सर्व बँक शाखा व्यवस्थापक, जालना
(मार्फत व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक, जालना)

**विषय:- कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी त्वरीत कठोर उपाययोजना करण्याबाबत.**

संदर्भ:- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ कलम ३०, ३१, ३४, ४१ व कलम ५१.
२) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) मा. मुख्यमंत्री महोदय यांची दिनांक १२.०३.२०२० व्हिडीओ कॉन्फरन्स मधील सुचना व निर्देश.
४) महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई- ३२ यांची दिनांक १३ मार्च २०२० ची अधिसुचना.
५) या कार्यालयाचे आदेश जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक ११/०३/२०२०
६) प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र ५८/ आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०
७) उपसचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे पत्र क्रमांक संकिर्ण २०२०/प्र.क्र १०१/एसडी- दि.१४ मार्च २०२०.
८) प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रायल मुंबई यांची अधिसुचना दिनांक १४ मार्च २०२०.
९) सह सचिव, महाराष्ट्र शासन,बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक विभशा/२०२०/प्र.क्र ३०४/ विजाभज-२ दिनांक १६ मार्च २०२०.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३, व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणास याद्वारे सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त जिल्हयातील सर्व ए.टी.एम. बंद राहणार नाहीत तसेच ए.टी.एम. मध्ये कॅश चा तुटवडा पडणार नाही, याची खबरदारी व दक्षता घ्यावी. तसेच ए.टी.एम. मशीन ची स्वच्छता व प्रत्येक तासाला निर्जंतुकीकरण बाबत आवश्यक त्या उपाययोजना करणे बाबत आवश्यक त्या सूचना आपल्या स्तरावरुन जिल्हाभरातील सर्व बँकेच्या व्यवस्थापकांस देण्यात याव्यात आणि अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Rawt

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**